२२ डिसेंबर,२०१३

# राजकीय संधिसाधू पणाला लोकप्रिय समर्थनाचा मुखवटा चढवला गेला

अरुण जेटली

(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)

माझ्यासाठी जून १९७५ ते जानेवारी १९७७ मध्ये लागलेली आंतरिक आपत्तीचा कालावधी हा खूप काही शिकण्यासारखा होता. तेव्हा मी विद्यार्थी होतो आणि बंदी बनवल्या गेलेल्या तरुणांमध्ये शामिल होतो ज्यांना आणीबाणी चा विरोध केल्यामुळे १९ महिने जेल मध्ये राहावे लागले होते. जेल मध्ये आमच्या सर्वांसाठी हा एक यक्ष प्रश्न होता की, अखेर आणखी किती दिवस हि आणीबाणी राहील. तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी सतत दडपशाही, आणीबाणी लावणे, प्रेस सेन्सरशिप आणि राजकारण्यांना बंदी बनवणे यास असे सांगून योग्य ठरविले जात होते की 'अनुशासन' काळात कडू घोट प्यावे लागतात.त्यांचा दावा असा होता की भारताच्या जनतेने याला योग्य ठरविले आहे. त्यांना विश्वास होता की आणीबाणी काळात त्यांनी ज्या २० सूत्री कार्यक्रमाची घोषणा केली ती खूप लोकप्रिय आहे. किती समर्थन आहे त्याचा कोणतच गणित नव्हते. मात्र आपल्या राजकीय निर्णयाला योग्य ठरवणे हा त्यांचा एकतर्फी दृष्टीकोन होता. त्यांनी १९७७ च्या शेवटी आणीबाणी ला लोकप्रिय समर्थन मिळाल्याच्या आधारावर निवडणुकांची घोषणा केली. त्या निवडणुकीत वाईट प्रकारे हरल्या. एवढेच नव्हे तर त्यांना आपली सीट सुद्धा गमवावी लागली.

अधिक प्रचार केल्याचे काही नुकसान सुद्धा असतात. जनतेला उक्सावणारा आपल्या तर्कांना नेहमीच खरे ठरवत असतो. युपिए सरकार आपल्या तथाकथित उपक्रमांचे मोठ -मोठ्या जाहिरातींना घेऊन स्वतःच भ्रमित झाली.

आम आदमी पार्टी

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचे कार्य निश्चितच उल्लेक्नीय होते. त्यांचा गुपचूप आणि शिस्तबद्ध अभियान कामी आले. ती आपल्या विचारांना लोकांपर्यंत पोचवण्यास यशस्वी ठरली. मोठ्या संख्येने लोकांनी यास स्वीकार केले. ती वोट आणि सीट च्या अनुषंगाने भाजप नंतरचा दुसरा मोठा पक्ष ठरला. दिल्लीत त्रिशंकू विधानसभा बनली. त्रिशंकू विधानसभेला एक विफल विधानसभा मानली जाते असे नाही. जर लहान पक्ष एखाद्या मोठ्या पक्षाला समर्थन देत असेल तर सरकार बनवणे शक्य होते. दिल्लीत आठ जागा मिळवलेली काँग्रेस संतुलन साधण्याचे काम करू शकते. त्यांनी आम आदमी पक्षाला सशर्त समर्थन देण्याची घोषणा केली आहे.

आप ने स्पष्ट सांगितले आहे की ती वैकल्पिक राजनीती चे प्रतिनिधित्व करते. ती विचारधारांशी प्रेरित आहे. ती कॉग्रेस किंवा भाजपाचे समर्थन करणार नाही आणि घेणार नाही. जर आप आपली सार्वजनिक मार्गावर कायम राहिली तर दिल्ली विधानसभेचे गतिरोध तुटणार नाही ज्यामुळे काही वेळेनंतर नवी निवडणूक घ्यावी लागेल.

असे प्रतीत होते की आप पक्ष वैकल्पिक राजनीतीच्या आपल्या छबी बरोबर समझोता करत आहे मग तो स्वताला न्यायोचित कसे काय ठरवू शकतो. शेवटी विचारधारे पासून प्रेरित वैकल्पिक राजनिती मध्ये राजकीय संधीसाधुपणाला स्थान नसले पाहिजे. आप या गोष्टीनी चिंतीत होऊ शकते की त्यांच्या आमदारांसह आणखी अनेक आमदारांना लवकर निवडणूक नको आहे. सत्ता  प्राप्त करण्यासाठी हि रणनीती होऊ शकते की काही लोक आमिष दाखवून मग निर्णय घेतात आणि नंतर स्वताला पुढच्या साठी तयार करणे. अशी सर्व रणनीती अंगीकारण्यासाठी आप ला आपल्या घोषित स्थिती हून पलटी मारावी लागेल. काँग्रेस कडून समर्थन घ्यायचे असेल तर जनतेला दिलेल्या वाचानांपासून मागे हटावे लागेल. हेच कारण आहे की त्यांनी पुन्हा जनमत मिळाल्याचा बनव केला. हा जनमत संग्रह स्वतःला स्थापित करण्यासाठी उपाय मात्र आहे.  अशा गर्दीला खेचून आणण्यात येत आहे जे त्यांना समर्थन देऊ शकतात. एकच प्रश्न विचारला जात आहे की काय आप ला सरकार बनविली पाहिजे.

साहजिकच आहे ते या विचाराने उत्साहित होतील. आकडे पहिले तर चमत्कारिक आहे की आप ला लोकांनी ३० टक्क्याहून कमी लोकांनी मत दिले मात्र ७५ टक्क्याहून अधिक लोक सांगतात की त्यांनी सरकार बनवावी.

खरे तर राजकीय संधिसाधू पणाला लोकप्रिय समर्थांचा मुखवटा घातला जात आहे. अशी परिस्थिती निर्माण केली जात आहे की ज्यात त्यांचे नेते असा युक्तिवाद करू शकतात की त्यांना  सत्तेची भूक नाही आहे. आम्ही काँग्रेस चे समर्थन घेण्यासाठी जाणार नाहीत. मात्र आम्ही लोकतांत्रिक आहोत जो जनतेच्या इच्छांसमोर झुकत आहे. हि जनता आहे जिची इच्छा आहे की आप ला कॉंग्रेस च्या समर्थनाने सरकार बनविली पाहिजे. काय हि वैकल्पिक राजनीतीची सुरुवात आहे की त्याचा अंत आहे.